**ORCHIDS THE SCHOOL, UNDRI**
**S.No.59/1B Katraj-Hadapsar BypassRoad, Behind Undri City**
**Atur Nagar, Undri, Pune, Maharashtra 411060**

ORCHIDS
The School

# मुख्य अग्निशमन अधिकारी यांचे कार्यालय
## पुणे महानगरपालिका, पुणे

मध्यवर्ती अग्निशमन केंद्र, महात्मा फुले पेठ, पुणे-४११०४२.
ई-मेल-pmcfireoffice@punecorporation.org,दूरध्वनी क्र.०२०२६४५१७०७

जा.क्र. ४५२८ (१०९६/२०२३) दिनांक १२/१२/२४

प्रती,

वास्तूविशारदाचे नाव – श्री दिपेश भुरट
भांडारकर रोड, पुणे

**विषय :- स.नं.५९/१अ,५९/१ब,उंड्री, पुणे येथील शैक्षणिक इमारतीकरिता अग्निशमन दलाचा अंतिम ना हरकत दाखला मिळणेबाबत.(इमारत विंग 'ए' करिता)**
**( इमारत उंची- १०.८० मी. व इमारतीचे एकूण क्षेत्रफळ-३१०९.६७ चौ. मी. )**

संदर्भ :-१) आपलेकडील अर्ज इकडील आ. क्र.७२५६, दिनांक ०८/१०/२०२४.
२) प्राथमिक ना हरकत दाखला क्र. एफबी/४५९०, दि.२८/१२/२०२३.
३) बांधकाम विकास विभाग, पुणे मनपा, क्र. सीसी/२०८३/२२, दि.१०/११/२०२२.

महोदय

आपले विनंतीनुसार, या अग्निशमन विभागाच्या प्रतिनिधीने दि.२७/११/२०२४ रोजी श्री मनिष कुमार यांच्यासह प्रस्तावित जागेला भेट दिली आणि प्राथमिक अग्निशमन ना हरकत दाखल्यामध्ये सुचविलेल्या उपकरणे आणि पोर्टेबल अग्निशामक उपकरणांसह हायड्रंट प्रणाली, होज रील प्रणाली इत्यादीची चाचणी केली. सुधारित प्राथमिक ना हरकत दाखला क्र. एफबी/४५९०, दि.२८/१२/२०२३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवन सुरक्षा उपाय अधिनियम २००६ नुसार आग प्रतिबंधक उपाययोजना केल्याचे व सुस्थितीत असलेबाबतचे मे. ऑर्टस फायर व सिक्युरिटी सिस्टिम्स प्रा. लि., पुणे यांनी प्रमाणपत्र 'अ' सादर करण्यात आलेले आहे. सदर इमारती साठी वार्षिक फी पोटी चलन क्र.१६१०५, दि.११/१२/२०२४ अन्वये रक्कम रु.५,७००/- पुणे म.न.पा. कोषागारात भरण्यात आलेले आहे.

तरी वरील बाबींचा विचार करता, सदर ठिकाणी करण्यात आलेल्या आग प्रतिबंधक उपाययोजना कायम सुस्थितीत व कार्यान्वित ठेवण्याचे, दरवर्षी अग्निशमन दलाकडून सदरील यंत्रणा तपासणी करून त्याप्रमाणे ना हरकत दाखला प्राप्त करून घेण्याचे अटींस अधीन राहून, विषयांकित ठिकाणचे इमारतीच्या वापरासाठी या विभागाचा अग्निसुरक्षेच्या दृष्टीने अंतिम ना हरकत दाखला देण्यात येत आहे. तसेच अग्निशमन यंत्रणेच्या दुरुस्तीची कामे ही परवानाधारक कंत्राटदारा कडूनचं करून घेण्यात यावी. त्यांची यादी /www.maharashtrafireservices.org या वेबसाईट वर उपलब्ध आहे.

इमारतीच्या देखभालीची जबाबदारी असलेल्या व्यक्तीचे, मालकाचे नाव या कार्यालयाला कळवावे. इमारतीमध्ये दिलेली अग्निसुरक्षा यंत्रणा कोणत्याही कारणास्तव इमारतीतून काढू नये.

सदर अंतिम ना हरकत दाखला इतर कोणत्याही विभागाद्वारे घातल्या जाणाऱ्या इतर कोणत्याही अटींच्या अधीन आहे.

12/12/24
( समीर वं.शेख )
स्टेशन ड्युटी ऑफिसर
पुणे महानगरपालिका

12/12/24
( देवेंद्र पोटफोडे )
मुख्य अग्निशमन अधिकारी
पुणे महानगरपालिका

प्रत :- अधीक्षक अभियंता, बांधकाम विकास विभाग, पुणे मनपा.

SCHOOL MANAGER
Orchids The School

PRINCIPAL
ORCHIDS THE SCHO
UNDRI